मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# रमाईंचा त्याग आणि समर्पणच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यामागची खरी ताकद

## केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले; त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर सृष्टी प्रकल्पाचे पिंपरीत भूमिपूजन संपन्न



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पिंपरी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक (भीमसृष्टी) लगत उभारण्यात येणाऱ्या त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर सृष्टी या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे भूमिपूजन केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. या सोहळ्यास भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू डॉ. भीमराव आंबेडकर प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापौर रवि लांडगे होते.

भूमिपूजन सोहळ्यास आमदार महेश लांडगे, उमा खापरे, शंकर जगताप, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, उपमहापौर शर्मिला बाबर, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, माजी मंत्री विजय गिरकर, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, विधी समिती सभापती सुजाता बोराटे, शहर सुधारणा समिती सभापती संजय काटे, शिक्षण समिती सभापती रविना आंगोळकर, महिला व बालकल्याण समिती सभापती राणी पठारे, माजी महापौर तथा नगरसदस्य योगेश बहल, डॉ. वैशाली घोडेकर, शंकुतला धराडे, नगरसदस्य सिद्धार्थ बनसोडे, सारिका मासुळकर, राहुल भोसले, अनुराधा गोरखे, सुप्रिया चांदगुडे, कुशाग्र कदम, तुषार हिंगे, नगरसदस्य शत्रुघ्न काटे, राहुल कलाटे, डॉ. सुहास कांबळे, धर्मपाल तंतरपाळे, कुणाल व्हावळकर, बाबासाहेब त्रिभुवन, कुंदन गायकवाड, निलेश नेवाळे, सारिका गायकवाड, निकिता कदम, सोनम मोरे, रेश्मा भुजबळ, श्रुती वाकडकर, तृप्ती कांबळे, प्रियांका कुदळे, योगिता बारणे, अर्चना सस्ते, माजी नगरसेवक विकास डोळस, मारुती भापकर, अंकुश कानडी, माजी नगरसदस्या चंद्रकांता सोनकांबळे यांच्यासह पुणे महापालिकेचे उपमहापौर परशुराम वाडेकर, नगरसदस्य निलेश आल्हाट तसेच सहशहर अभियंता मनोज सेठिया, उप आयुक्त अण्णा बोदडे, सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक व विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात बोलताना केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले म्हणाले, “त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर या संघर्ष, त्याग आणि समर्पणाची जिवंत प्रतिमा होत्या. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मानवमुक्तीच्या महान कार्याला खंबीर साथ दिली. बाबासाहेबांनी देशाला संविधान, स्वाभिमान आणि विचार दिला; पण त्या विचारांना उभं राहण्यासाठी जी शांत आणि निःस्वार्थ ताकद लागते, ती रमाईंच्या रूपाने त्यांच्या पाठीशी होती.”

ते पुढे म्हणाले की, पिंपरी येथे उभारले जाणारे माता रमाईंचे स्मारक म्हणजे केवळ एक वास्तू नसून संघर्ष, स्त्रीशक्ती आणि सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासाचे प्रेरणास्थान ठरेल.

रामदास आठवले यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, “डॉ. बाबासाहेब नसते तर आम्हाला आज मुक्तपणे बोलण्याचाही अधिकार मिळाला नसता. शाळेच्या बाहेर बसून शिक्षण घेणाऱ्या बाबासाहेबांनी पुढे देशाला संविधान देत समानतेचा पाया रचला.”

त्यांनी समाजातील शिक्षण, समानता आणि स्वाभिमानाचे वातावरण बाबासाहेबांच्या विचारांमुळेच निर्माण झाले असल्याचे नमूद केले.

कार्यक्रमात आठवले यांनी त्यांच्या खास शैलीत शायरी सादर करत उपस्थितांची दाद मिळवली.

“बाबासाहेबांकडे नव्हती पैशांची कमाई,
पण त्यांच्या मागे उभी होती रमाई...”

“माझा भीम आहे चमकता तारा,
त्याचा अपमान केला तर वाजवू बारा...”

डॉ. भीमराव आंबेडकर यांनी पिंपरीतील भीमसृष्टीचे कौतुक करत सांगितले की, “देशभरातून लोक बाबासाहेबांच्या पुतळ्याविषयी मार्गदर्शन विचारतात, तेव्हा मी त्यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने उभारलेला पुतळा पाहण्याचा सल्ला देतो.”

ते म्हणाले की, पिंपरीत बाबासाहेब, महात्मा जोतीराव फुले, सावित्रीबाई फुले आणि आता माता रमाई यांच्या स्मारकांमुळे सामाजिक परिवर्तनाचा सशक्त वारसा जतन होत आहे.

महापौर रवि लांडगे यांनी सांगितले की, माता रमाई स्मारकासाठी कार्यकर्त्यांनी तब्बल १५ वर्षे सातत्याने लढा दिला. त्या संघर्षाला आज न्याय मिळाल्याचे समाधान आहे.

ते म्हणाले, “देशात पहिल्यांदाच माता रमाईंचे असे भव्य स्मारक उभारले जात आहे. सुमारे २७ कोटी रुपयांच्या खर्चातून हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प साकारला जाणार आहे

सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी सांगितले की, माता रमाई सृष्टीचा हा प्रकल्प केवळ पिंपरी चिंचवडसाठी नव्हे, तर संपूर्ण समाजासाठी ऐतिहासिक ठरणार आहे. संघर्ष, त्याग आणि सामाजिक परिवर्तनाच्या मूल्यांना दिलेला हा सन्मान असून येणाऱ्या पिढ्यांसाठी प्रेरणास्थान ठरेल.

भूमिपूजन सोहळ्यास विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, स्थानिक नागरिक, युवक आणि महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. या प्रकल्पामुळे पिंपरी चिंचवड शहराच्या सामाजिक व सांस्कृतिक वैभवात भर पडणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

यावेळी माजी मंत्री विजय गिरकर, नगरसदस्या वैशाली घोडेकर यांनी देखील मनोगत व्यक्त केले. तसेच उपस्थितांचे आभार नगरसदस्य धर्मपाल तंतरपाळे यांनी मानले तर सुत्रसंचालन विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले. याशिवाय यावेळी केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या वतीने सहशहर अभियंता मनोज सेठिया, कार्यकारी अभियंता विजय जाधव, संदीप ठोकळे, मूर्तीकार महेंद्र थोपटे, आर्किटेक्ट एस. चिद्दरवार यांचा तसेच उप आयुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांचाही सन्मान करण्यात आला.

### गीतगायनाने भारावला भीमसृष्टी परिसर

**» त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर सृष्टीच्या भूमिपूजन कार्यक्रमानिमित्त सुप्रसिद्ध लोकगायक आनंद शिंदे यांच्या गीतगायनाच्या कार्यक्रमाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या आवाजात सादर झालेल्या सामाजिक जाणीवा जागृत करणाऱ्या तसेच प्रेरणादायी गीतांनी उपस्थितांच्या मनावर ठसा उमटवला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना आणि सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीला अभिवादन करणाऱ्या गीतांवर नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत टाळ्यांच्या गजरात दाद दिली. या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी पिंपरी चिंचवड परिसरासह शहराच्या विविध भागांतून नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

# विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला 'प्रोजेक्ट बेस्ड एक्झिबिशन'चे पाठबळ आवश्यक

## स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे; विद्यार्थ्यांच्या संशोधक वृत्तीचे अभिषेक बारणे यांच्याकडून कौतुक

**पिंपरी | प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी आणि त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी 'प्रोजेक्ट बेस्ड लर्निंग' (प्रकल्प आधारित शिक्षण) ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी केले.



काळेवाडी येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण मंडळ आणि आकांक्षा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने चालविल्या जाणाऱ्या कै. दत्तोबा रामचंद्र काळे इंग्रजी माध्यम शाळेच्या वतीने 'प्रोजेक्ट बेस्ड एक्झिबिशन'चे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. त्यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्राचार्य रितू पचारिया आणि विद्यार्थ्यांच्या वतीने मान्यवरांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. याप्रसंगी नगरसेवक बाबासाहेब त्रिभुवन, भाजपा मंडल अध्यक्ष सनी बारणे, शाळेचे शिक्षक, आकांक्षा फाउंडेशनचे प्रतिनिधी, पालक आणि निमंत्रित सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

थेरगाव येथील शाळेच्या सेकंडरी कॅम्पसमध्ये हे प्रदर्शन भरवण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी विज्ञान, पर्यावरण, तंत्रज्ञान आणि सामाजिक जाणीव या विषयांवर आधारित अत्यंत कल्पक आणि वैविध्यपूर्ण प्रकल्प सादर केले. विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान न घेता, ते प्रयोगांच्या माध्यमातून कसे मांडता येईल, याचे उत्तम सादरीकरण या प्रदर्शनातून केले. यावेळी सभापती अभिषेक बारणे यांनी प्रत्येक प्रकल्पाची बारकाईने पाहणी केली आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या संकल्पना जाणून घेतल्या.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अभिषेक बारणे म्हणाले की, "पुस्तकी ज्ञानासोबतच प्रकल्पांच्या माध्यमातून मिळणारे शिक्षण विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास खऱ्या अर्थाने वाढवते. पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण विभाग आणि आकांक्षा फाउंडेशन यांच्या प्रयत्नातून महापालिका शाळांच्या गुणवत्तेचा आलेख दिवसेंदिवस उंचावणारा आहे, ही बाब निश्चितच कौतुकास्पद आहे.

विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या या प्रकल्पांचे आणि शाळेच्या या उपक्रमाचे संपूर्ण परिसरातून कौतुक होत आहे.

> **"महापालिका शाळांमधील ही बदलती आणि आधुनिक शिक्षण पद्धती विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी महत्त्वाची ठरणारी आहे. अशा प्रकारचे उपक्रम विद्यार्थ्यांच्या संशोधक वृत्तीला चालना देतात. त्यामुळे आगामी काळात हे 'प्रोजेक्ट बेस्ड एक्झिबिशन' केवळ एका शाळेपुरते मर्यादित न ठेवता, संपूर्ण शहर पातळीवर आयोजित करण्यासाठी प्रशासन स्तरावर नक्कीच प्रयत्नशील राहू."**
>
> **- अभिषेक बारणे, स्थायी समिती सभापती, पिंपरी चिंचवड महापालिका.**

# पिंपरी-चिंचवडमधील सोसायटीधारकांच्या हक्कांसाठी लढण्यासाठी फेडरेशन 'कटिबद्ध'!

## पिंपरी-चिंचवड सहकारी गृहनिर्माण संस्था महासंघाची निवडणूक शांततेत; बिनविरोध निवडणूक करण्यासाठी दत्तात्रय देशमुख यांच्या मनाचा मोठेपणा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड सहकारी गृहनिर्माण संस्थांचा महासंघाच्या व्यवस्थापन समितीची निवडणूक शांततेत व उत्साहात पार पडली. या निवडणुकीचा अधिकृत निकाल प्राधिकृत अधिकारी विलास लिंबळे यांनी जाहीर केला. विशेष म्हणजे, महासंघाचे मावळते अध्यक्ष दत्तात्रय देशमुख यांनी निवडणूक बिनविरोध करावी, असा संदेश अर्ज माघारी घेतला. मात्र, ११ जागासांठी १४ अर्ज असल्यामुळे मतदान घ्यावे लागले.

सोसायटी फेडरेशनच्या कमिटीसाठी निवडणूक सन 2026 ते 2031 या कालावधीसाठी घेण्यात आली. एकूण ११ सदस्यांची ही निवडणूक सर्वसाधारण मतदार संघातून घेण्यात आली असून, एकूण अधिकृत 27 मते पडली. यापैकी सर्व 27 मते वैध ठरली असून, एकही मत अवैध झाले नाही. रविवार, दि. 26 एप्रिल 2026 रोजी सकाळी 10 वाजता विशेष अधिमंडळ बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीतच मतदान प्रक्रिया पूर्ण करून निकाल जाहीर करण्यात आला. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक व नियमानुसार पूर्ण करण्यात आली.

या निवडणुकीत विविध सोसायटींच्या प्रतिनिधींनी सहभाग घेतला होता. प्राधिकृत अधिकारी विलास लिंबळे यांनी निवडणुकीचा सविस्तर अहवाल व बैठकीचे इतिवृत्त संबंधित प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (3) यांच्याकडे सादर केले आहे.या निवडणुकीमुळे संस्थेच्या पुढील पाच वर्षांच्या कारभाराला नवे नेतृत्व मिळणार असून, सदस्यांमध्ये समाधानाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

नवीन कार्यकारिणीमध्ये पदवाटप दोन-तीन दिवसांत करण्यात येणार आहे. पिंपरी-चिंचवडमधील सोसायटीधारकांच्या हक्कांसाठी लढण्यासाठी फेडरेशन कटिबद्ध राहील, असा संकल्प नवनिर्वाचित सदस्यांनी केला आहे.



### निवडणूक झाली, तरी एकसंघ काम करणार..!

**» सोसायटी फेडरेशनची निवडणूक बिनविरोध व्हावी. या करिता सर्व सदस्यांनी प्रयत्न केला. मात्र, ११ जागांसाठी १६ उमेदवारी अर्ज दाखल झाले. ज्येष्ठ सदस्यांनी सर्वांना सहमतीने निवडणूक करा आणि बिनविरोध करण्याबाबत संवाद केला. त्यानंतर माजी अध्यक्ष दत्तात्रय देशमुख यांनी पुढाकार घेतला आणि स्वत:चा अर्ज माघारी घेतला. तसेच, "आपण निवडणूक बिनविरोध करु आणि सकारात्मक संदेश देवू.." अशी भूमिका मांडली. १६ पैकी दोन अर्ज माघारी झाले. पण, ३ अर्ज जास्तीचे असल्यामुळे निवडणूक घेणे अपरिहार्य ठरले. अखेर निवडणूक अधिकाऱ्यांनी मतदान घेण्याचा निर्णय घेतला. मतदान प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आणि सर्वाधिक मते मिळवलेल्या ११ विजयी उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली. नवनिर्वाचित सदस्यांमध्ये ज्या सहकाऱ्यांना संधी मिळाली नाही. त्यांना फेडरेशनवर तज्ञ- सल्लागार सदस्यपदी नियुक्ती करण्याचे विचाराधीन आहे. फेडरेशन आणि सोसायटीधारकांचे कार्य एकजुटीने आणि सक्षमपणे करण्यात येईल. यावर उपस्थित सर्व सदस्यांचे एकमत झाले आहे.**

### विजयी उमेदवारांची नावे

**» सचिन लोंढे, अरुण देशमुख, अधिकराव दिवे- पाटील, सचिन गुणाले,, विकास बाबर, प्रदीप घोरपडे, सचिन सिंध्ये, अजय तोडकर, रोहित सावंत, वैभव चौधरी, रोहित पाठक.**



# समाविष्ट 32 गावांमधील टॅक्सचा गोंधळ संपणार? मंत्री माधुरी मिसाळ यांच्याकडे प्रस्ताव

## दोन वर्षांपासून कर वसुलीस स्थगिती, मात्र आकारणीचे आदेश नसल्याने नागरिकांमध्ये संभ्रम

**पुणे | प्रतिनिधी**

राज्य शासनाने दोन वर्षांपूर्वी महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या ३२ गावांच्या मिळकतकर वसुलीस स्थगिती दिली आहे. त्यानंतर महापालिकेने शासनाने जे कर आकारणीचे आदेश दिले होते. त्यानुसार कर आकारणी केलेली नाही. अशा स्थितीत कर भरायचा की नाही, अशा मनस्थितीत या गावांमधील नागरिक असून, शासन आणि महापालिकेने तत्काळ यावर तोडगा काढावा, अशी मागणी महापालिकेच्या विरोधी पक्षांच्या गटनेत्यांनी सोमवारी आमदार माधुरी मिसाळ यांच्याकडे केली.

महापालिकेच्या प्रलंबित प्रश्नांबाबत ही बैठक बोलविण्यात आली होती. यात ही मागणी केल्याचे राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाचे गटनेते सोपानराव ऊर्फ काका चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. चव्हाण म्हणाले, की दोन वर्षांपासून समाविष्ट गावांच्या मिळकतकराचा प्रश्न प्रलंबित आहे. त्याबाबत कोणताही निर्णय होत नसल्याने काही जण कर भरतात, तर कोणी भरत नाही.

महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या ३२ गावांच्या मिळकतकर वसुलीस राज्य शासनाने दोन वर्षांपूर्वी स्थगिती दिली होती. त्यानंतर कर आकारणीबाबत स्पष्ट निर्णय न झाल्याने नागरिक संभ्रमात आहेत. काही जण कर भरत आहेत, तर काहींनी थांबवला आहे. त्यामुळे गावांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे.

अशा स्थितीत थकबाकीवर २ टक्के शास्तीही आकारली जाते. दुसरीकडे या गावांच्या विकासासाठी निधीही आवश्यक असून, नागरिक कर भरण्यास तयार आहेत. त्यामुळे तत्काळ या विषयावर तोडगा काढावा अशी मागणी केली असून, महापालिका आयुक्तांनीही पुढील १५ दिवसांत त्यासाठी बैठक घेण्याचे आश्वासन दिले आहे.

महापालिकेकडून समाविष्ट गावांसाठी समान पाणी योजनेच्या धर्तीवर उर्वरीत १६ गावांसाठी एकच योजना राबविली जाणार आहे. त्यासाठी पुरेसा निधी नसल्याने महापालिकेने जागतिक बँकेला प्रस्ताव दिला आहे. मात्र, तो निधी मिळाला, तरी प्रत्यक्षात योजनेची अंमलबजावणी आणि काम सुरू होण्यास आणखी काही वर्षे जाणार आहेत. त्यामुळे महापालिकेने प्रत्येकी दोन गावांचे क्लस्टर करून त्यांच्यासाठी छोटे छोटे पाणी प्रकल्प राबविण्याची मागणीही या बैठकीत केल्याचे चव्हाण यांनी स्पष्ट केले.



### पाणी योजनांनाही गतीची मागणी

» समाविष्ट गावांच्या विकासासाठी पाणीपुरवठा हा मोठा प्रश्न असून उर्वरित १६ गावांसाठी समान पाणी योजना राबविण्याचा विचार सुरू आहे. निधीअभावी जागतिक बँकेकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. मात्र, प्रत्यक्ष कामाला वेळ लागणार असल्याने तातडीच्या उपाययोजना आवश्यक आहेत. प्रत्येकी दोन गावांचे क्लस्टर करून छोटे पाणी प्रकल्प राबवावेत, अशी मागणी बैठकीत करण्यात आली.

### करप्रश्नामुळे नागरिक संभ्रमात

» महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या ३२ गावांच्या मिळकतकर वसुलीस राज्य शासनाने दोन वर्षांपूर्वी स्थगिती दिली होती. त्यानंतर कर आकारणीबाबत स्पष्ट निर्णय न झाल्याने नागरिक संभ्रमात आहेत. काही जण कर भरत आहेत, तर काहींनी थांबवला आहे. त्यामुळे गावांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. शासन आणि महापालिकेने स्पष्ट भूमिका जाहीर करून नागरिकांचा संभ्रम दूर करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

### थकबाकीवर शास्तीचा प्रश्न

» कर वसुलीबाबत अनिश्चितता असतानाही काही ठिकाणी थकबाकीवर दोन टक्के शास्ती आकारली जात असल्याची तक्रार पुढे आली आहे. यामुळे नागरिकांमध्ये नाराजी वाढली आहे. करप्रश्न निकाली निघेपर्यंत शास्ती आकारणी थांबवावी, अशी मागणी विरोधी पक्ष गटनेत्यांनी केली आहे. तसेच महापालिका आयुक्तांनी पुढील १५ दिवसांत यासंदर्भात बैठक घेण्याचे आश्वासन दिल्याची माहिती देण्यात आली.

# पुरंदर विमानतळ भूसंपादनाला येणार वेग; राज्य सरकारची 6 हजार कोटींच्या कर्जाला ‘थकहमी’

## पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी भूसंपादनापोटी 6 हजार कोटी रुपयांच्या कर्जाला राज्य सरकारची थकहमी मिळाली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

गेल्या तीन वर्षांपासून शहराचे वाढते तापमान, वाढलेल्या नागरिकांमुळे पाण्याची वाढलेली मागणी आणि महापालिकेस शहराला पाणीपुरवठा करताना येणाऱ्या अपयशामुळे पुणेकरांना आपली तहान भागविण्यासाठी वाढती टँकरचा आधार घ्यावा लागत आहे. गेल्या दोन वर्षांपासून शहरात पाण्याच्या टँकरची मागणी वर्षाला ५० हजार फेऱ्यांनी वाढली आहे.

एप्रिल २०२३ ते मार्च २४ मध्ये सुमारे ४ लाख ३४८ फेऱ्या झाल्या होत्या. ही संख्या एप्रिल २०२४ ते मार्च २५ पर्यंत ४ लाख ८९ हजारांवर गेली होती. एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ अखेर ही संख्या तब्बल ५ लाख १७ हजारांवर गेली. यातून गेल्या दोन वर्षांत सरासरी ५० ते ५५ हजार टँकरच्या फेऱ्या वाढल्याचे दिसते.

यंदा १ ते २६ एप्रिल या २६ दिवसांतच टँकरच्या ५५ हजारांहून अधिक फेऱ्या झाल्या आहेत. महिन्याच्या उर्वरित दिवसांतील मागणी लक्षात घेता एप्रिलअखेर हा आकडा ६२ ते ६३ हजार फेऱ्यांपर्यंत जाऊ शकतो, असा अंदाज पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांकडून व्यक्त केला आहे.

शहराच्या मध्यवर्ती भागांसह नव्याने समाविष्ट झालेल्या उपनगरांमध्येही टँकरवरील अवलंबित्व वाढले आहे. विहिरींची पातळी घटणे, धरणसाठ्यातील मर्यादित उपलब्धता आणि वाढते तापमान यामुळे अनेक भागांमध्ये नागरिकांना पर्यायी पाणीपुरवठ्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. उन्हाळ्याची तीव्रता मे महिन्यात आणखी वाढण्याची शक्यता असल्याने टँकरची मागणी आणखी वाढू शकते, अशी शक्यता प्रशासनाकडून वर्तविण्यात येत आहे.

महापालिका प्रशासनाकडून संपूर्ण शहरात समान पाणीपुरवठा करण्यासाठी २०१७ पासून समान पाणी योजनेचे काम सुरू करण्यात आले. या योजनेसाठी सुमारे २५०० कोटी रुपये खर्चून ८२ पाण्याच्या टाक्या उभारण्याचे नियोजन करण्यात आले होते, तसेच पाण्याच्या वापरावर नियंत्रण आणण्यासाठी सुमारे २ लाख ८० हजार पाणीमीटर बसविणे आणि नव्याने १६०० किलोमीटर जलवाहिन्या टाकण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते.

मात्र, गेल्या नऊ वर्षांपासून योजना सुरू असतानाही आतापर्यंत केवळ ३० ते ३५ टक्के टाक्याच कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे समान पाणी योजनेचा अपेक्षित परिणाम अद्यापही दिसत नसल्याने टँकरची मागणी वाढली आहे.



### मार्च मध्ये तब्बल ५८ हजार फेऱ्या

» महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडील नोंदीनुसार, मार्च २०२४ मध्ये शहरभर टँकरच्या सुमारे ३८ हजार २९९ फेऱ्या झाल्या होत्या. मार्च २०२५ मध्ये या फेऱ्यांची संख्या सुमारे ४७ हजार ८९६ वर पोहोचली. यंदाच्या मार्च २०२६ मध्ये ही संख्या थेट ५८ हजारांच्या पुढे गेली. त्यामुळे शहरातील अनेक भागांमध्ये पाण्याची मागणी झपाट्याने वाढत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# खासदार पार्थ पवार यांचा मास्टरस्ट्रोक?

## विक्रम काकडे यांचे नाव विधानपरिषदेवर जवळपास निश्चित; राष्ट्रवादीची विधानपरिषद जागा पुण्याला

**पुणे | प्रतिनिधी**

विधान परिषद निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी आता अवघे काही दिवस शिल्लक राहिले असल्याने सर्वच पक्षांमध्ये जोरदार हालचाली सुरू झाल्या आहेत.

महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात सध्या सर्वाधिक चर्चा अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून विधान परिषदेसाठी कोणाला संधी मिळणार याची आहे. विशेष म्हणजे, पक्षाच्या निर्णय प्रक्रियेत पार्थ पवार यांची वाढती भूमिका लक्षवेधी ठरत असून, या निवडणुकीत त्यांच्या निर्णयाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

या विधान परिषद निवडणुकीच्या माध्यमातून पार्थ पवार यांना स्वतःची विश्वासू आणि सक्षम टीम तयार करण्याची मोठी संधी असल्याचे बोलले जात आहे. पुढील तीन वर्षांनंतर लोकसभा आणि विधानसभा निवडणुका होणार असल्याने पक्ष संघटन अधिक मजबूत करणे आवश्यक मानले जात आहे.

यासाठी अनुभवी नेत्यांसोबतच नव्या दमाचे, तरुण आणि विश्वासू चेहरे पुढे आणण्याची गरज निर्माण झाली आहे. त्यामुळे ही निवडणूक पार्थ पवारांसाठी दीर्घकालीन राजकीय रणनीतीचा महत्त्वाचा भाग ठरू शकते

पक्षातील सूत्रांच्या माहितीनुसार, प्रदेशाध्यक्ष व खासदार सुनील तटकरे यांचे पुत्र अनिकेत तटकरे, प्रफुल्ल पटेल यांचे निकटवर्तीय माजी आमदार राजेंद्र जैन, माजी आमदार अमोल मिटकरी, पुणे शहराध्यक्ष सुनील टिंगरे, प्रवक्ते आनंद परांजपे, उमेश पाटील यांची नावे चर्चेत आहेत. यासोबतच माजी खासदार संजय काकडे यांचे पुत्र विक्रम काकडे यांचे नाव देखील जोरदार चर्चेत आले आहे.

या सर्व नावांमध्ये विक्रम काकडे यांची चर्चा अधिक ठळकपणे होताना दिसत आहे. त्यांची ओळख पार्थ पवार यांचे विश्वासू सहकारी म्हणून असून, पक्ष नेतृत्वासोबत त्यांचे अनेक वर्षांपासून जवळचे संबंध आहेत. अजित पवार आणि त्यांच्या परिवारासोबत त्यांनी सातत्याने काम केले आहे. त्यामुळे पक्षातील नव्या नेतृत्वामध्ये त्यांचे नाव गांभीर्याने घेतले जात आहे.

याशिवाय विक्रम काकडे यांना मजबूत राजकीय वारसा लाभला आहे. पुणे शहरात यापूर्वी त्यांचे वडील संजय काकडे यांनी मोठी संघटनात्मक ताकद उभी केली होती. त्यांच्या नेतृत्वाखाली तब्बल ४० नगरसेवक निवडून आल्याची नोंद आहे. हीच ताकद भविष्यात विक्रम काकडे यांच्या माध्यमातून पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेसला पुणे शहरात अधिक बळकट करू शकते, अशी पक्षांतर्गत चर्चा सुरू आहे.

त्यामुळे विधान परिषदेसाठी चर्चेत असलेल्या नावांपैकी अंतिम संधी कोणाला मिळणार, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. विक्रम काकडे यांच्या निवडीच्या माध्यमातून पार्थ पवार यांचा हा एक मोठा मास्टरस्ट्रोक ठरणार का, याची उत्सुकता आता वाढली आहे. गुरुवारी (दि.३० एप्रिल) याबाबतचे चित्र स्पष्ट होणार आहे



### विक्रम काकडे आघाडीवर?

» माजी खासदार संजय काकडे यांचे पुत्र विक्रम काकडे यांचे नाव सर्वाधिक चर्चेत आले आहे. पार्थ पवार यांचे विश्वासू सहकारी म्हणून त्यांची ओळख असून पक्ष नेतृत्वाशी त्यांचे जवळचे संबंध असल्याचे मानले जाते. पुण्यातील मजबूत राजकीय वारसा आणि संघटनात्मक ताकद यामुळे त्यांना संधी मिळू शकते, अशी चर्चा आहे. त्यांच्या निवडीमुळे पुणे शहरात राष्ट्रवादी काँग्रेसला नवे बळ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### पार्थ पवारांची वाढती भूमिका

» विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उमेदवारीबाबत जोरदार हालचाली सुरू आहेत. पक्षाच्या निर्णय प्रक्रियेत पार्थ पवार यांची वाढती भूमिका सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुका लक्षात घेता पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी विश्वासू आणि तरुण चेहऱ्यांना संधी देण्याचा विचार सुरू असल्याची चर्चा आहे. त्यामुळे या निवडणुकीकडे पक्षाच्या भविष्यातील रणनीतीच्या दृष्टीने महत्त्वाने पाहिले जात आहे.

### चर्चेत अनेक दिग्गज नावे

» पक्षांतर्गत चर्चेनुसार अनिकेत तटकरे, राजेंद्र जैन, अमोल मिटकरी, सुनील टिंगरे, आनंद परांजपे आणि उमेश पाटील यांची नावे चर्चेत आहेत. या सर्व नावांमध्ये संघटन कौशल्य, पक्षनिष्ठा आणि स्थानिक पातळीवरील प्रभाव या निकषांवर चर्चा सुरू आहे. विधान परिषद निवडणुकीत योग्य उमेदवार निवडून पक्षाला राजकीय बळ देण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे अंतिम उमेदवारीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# खडकवासला धरणातून 2.52 टीएमसी पाणी विसर्ग; शेतकऱ्यांना दिलासा

## बारामती, दौंड, इंदापूरसह हवेलीतील पिकांना संजीवनी; मेपर्यंत आवर्तन सुरू राहणार

**पुणे | प्रतिनिधी**

बारामती, दौंड, इंदापूरसह हवेली तालुक्यातील शेतीसाठी खडकवासला धरणसाखळीतून उन्हाळी आवर्तन सोडण्यात आले आहे. गेल्या 30 दिवसांत शेतीसाठी मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग करण्यात आला. 29 मार्च ते 27 एप्रिल या कालावधीत 2.52 टीएमसी पाणी नवीन मुठा उजवा कालव्याद्वारे सोडण्यात आले. यामुळे पिकांना आधार मिळाला आहे

उन्हाची तीव्रता वाढत असल्याने शेतीसाठी पाण्याची मागणी वाढली आहे. खडकवासला कालव्याद्वारे सोडण्यात आलेल्या पाण्याचा फायदा इंदापूर, हवेली, दौंड आणि बारामती या तालुक्यांतील लाभक्षेत्रातील पिकांना होत आहे. प्रामुख्याने उन्हाळी पिके आणि फळबागांना हे पाणी संजीवनी ठरत आहे.

मे महिन्यापर्यंत उन्हाळी आवर्तन सुरू राहणार असल्याचे खडकवासला पाटबंधारे विभागाच्या शाखा अभियंता गिरिजा कल्याणकर यांनी सांगितले. यंदा धरणांमध्ये पाण्याची स्थिती गेल्या वर्षीपेक्षा चांगली आहे. सध्या चारही धरणांत मिळून 10.67 टीएमसी म्हणजे 36.61 टक्के पाणीसाठा आहे. गेल्या वर्षी 9.42 टीएमसी म्हणजे 32.30 टक्के होता.

जिल्ह्यातील शेतीसह पुणे शहरासाठी देखील पाणी सोडले जात आहे. वाढत्या तापमानामुळे होणारे बाष्पीभवन आणि पिण्याच्या पाण्याची वाढती गरज, यामुळे सिंचन विभागासमोर नियोजनाचे आव्हान आहे. सध्या तरी धरणसाखळीत समाधानकारक पाणीसाठा आहे.



### धरणसाखळीत समाधानकारक पाणीसाठा

» जिल्ह्यातील शेतीसह पुणे शहरासाठी देखील पाणी सोडले जात आहे. वाढत्या तापमानामुळे होणारे बाष्पीभवन आणि पिण्याच्या पाण्याची वाढती गरज, यामुळे सिंचन विभागासमोर नियोजनाचे आव्हान आहे. सध्या तरी धरणसाखळीत समाधानकारक पाणीसाठा आहे.